| | | | |
|---|---|---|---|
| CNR No. MHRG040006842025 | दाखल तारीख | : | ०४/०२/२०२५ |
| | नोंदणी तारीख | : | १९/०३/२०२५ |
| | निकाल तारीख | : | ०७/०४/२०२६ |
| | कालावधी | : | ०१ व. ०२ म. ०३ दि. |

**२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, पनवेल-रायगड यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी : ए.एस. बडगुजर)**

**विवाह याचिका क्र.११९/२०२५**
**निशाणी क्र.१४/अ**

**आणि**

**...याचिकाकर्ते क्र.२**

-----------------------------------------------------------------

हिंदू विवाह कायदा १९५५ चे कलम १३(ब) अन्वये संमतीने घटस्फोट मिळणेसाठीची याचिका.

-----------------------------------------------------------------

याचिकाकर्ते क्र.१ तर्फे विधीज्ञ सुचिता एस. पाटील.
याचिकाकर्ते क्र.२ तर्फे विधीज्ञ स्नेहलता धोत्रे.

-----------------------------------------------------------------

**: न्यायनिर्णय :**
**(जाहीर दिनांक ०७/०४/२०२६)**

अर्जदार व सामनेवाला यांनी मुळ अर्ज हिंदु विवाह कायदा, १९५५ चे कलम १३(१)(ia) अन्वये विवाह विच्छेदनाकरिता दाखल केला होता. त्यानंतर अर्जदार व सामनेवाला यांच्यामध्ये समझोता होऊन

त्यांनी मुळ अर्जात निशाणी क्र.७ वरील आदेशान्वये दुरुस्ती करुन सदरची याचिका हिंदू विवाह कायदा, १९५५ चे कलम १३(ब) अन्वये संमतीने विवाह विच्छेदन होऊन मिळण्याकरिता दाखल केलेली आहे. निशाणी क्र.८ वरील आदेशान्वये याचिकाकर्ते यांचा ६ महिन्यांचा कालावधी हिंदु विवाह कायदा, कलम १३-ब(२) अन्वये माफ करण्यात आला आहे.

२. याचिकाकर्ते क्र.१ व २ यांचे थोडक्यात कथन असे की, त्यांचा विवाह दिनांक १४/०५/२०१८ रोजी ठाणे येथे वैदिक पध्दतीने संपन्न झाला असुन त्यानंतर याचिकाकर्ते यांनी दिनांक १८/०६/२०१८ रोजी हिंदु धर्माप्रमाणे व रितीरिवाजाप्रमाणे विवाह केलेला आहे. याचिकाकर्ते यांना सदर लग्नसंबंधातुन एक मुलगी वय ४ वर्षे असे अपत्य आहे. विवाहानंतर याचिकाकर्ते यांचेमध्ये मतभेद होऊ लागले. उभयतांमधील मतभेद दूर करण्यासाठी अनेक प्रयत्न करण्यात आले. परंतु सर्व प्रयत्न निष्फळ झाले. याचिकाकर्ते क्र.१ व २ हे मे २०२४ पासून एकमेकांपासून विभक्त राहत आहेत. सबब, याचिकाकर्ते यांनी प्रस्तुतची याचिका दाखल केली आहे.

३. याचिकाकर्ते क्र.१ यांनी निशाणी क्र.११ वर तसेच याचिकाकर्ते क्र.२ यांनी निशाणी क्र.१२ वर त्यांच्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले. त्यात त्यांनी नमूद केले आहे की, विवाहानंतर त्यांचेमध्ये मतभेद होऊ लागले. त्यांनी यापुढे असे कथन केले आहे की, त्यांच्यात समझोता घडवुन आणण्याचे प्रयत्न करण्यात आले, परंतू त्यांना यश आले नाही म्हणून त्यांनी समजोत्याने व एकमेकांच्या संमतीने घटस्फोट घेण्याचे ठरविले आहे. याचिकाकर्ते यांनी पुरावा संपल्याची पुरशीस निशाणी क्र.१३ अन्वये दाखल केली आहे. मध्यस्थांचा अहवाल निशाणी क्र.१० अन्वये अभिलेखावर दाखल आहे. याचिकाकर्ते यांच्या पुरावा प्रतिज्ञापत्रातील

मजकूर पाहिला असता दोन्ही याचिकाकर्ते मे २०२४ पासून एकत्र राहत नसून विभक्त राहत असल्याचे स्पष्ट होते. याचिकाकर्ते यांनी त्यांच्या विवाहाची पत्रिका, विवाहाचा फोटो, अर्जदार क्र.१ व २ यांच्या आधारकार्डची प्रत अशी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

४. सदरची याचिका याचिकाकर्ते यांनी त्यांना परस्पर संमतीने विवाह विच्छेदन होऊन मिळण्याकरीता दाखल केलेली आहे. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची बळजबरी, अट व गैरवाजवी दडपण असल्याचे दिसून येत नाही. ही याचिका नामंजूर करण्यास कोणतेही सबळ कारण दिसून येत नाही. म्हणून सदर याचिका मंजूर करून खालील आदेश पारीत करीत आहे.

**: आदेश :**

१. याचिका मंजूर करण्यात येत आहे.

२. याचिकाकर्ते क्र.१ व याचिकाकर्ते क्र.२ यांचा दिनांक १४/०५/२०१८ रोजी संपन्न झालेला विवाह हा हिंदू विवाह कायदा, १९५५ चे कलम १३-ब नुसार आपसी संमतीने प्रस्तुत न्यायनिर्णयाच्या दिनांकापासून विच्छेदीत करण्यात येत आहे.

३. येणेप्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Digitally signed by ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Date: 2026.04.07 17:40:45 +0530

पनवेल
दिनांक : ०७/०४/२०२६.

**(ए.एस. बडगुजर)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
पनवेल.